क्र. १३३ पहिले वर्ष

# रविवारची उपासना

१२ मार्च २०२३

## प्रायश्चित्तकाळातील तिसरा रविवार

### प्रस्तावना

आजची तिन्ही वाचने 'पाणी' ह्या चिन्हाविषयी सांगत असताना त्यात परमेश्वराच्या जीवनदायी उपस्थितीचे भाविकांना दर्शन घडविते. पहिल्या वचनात तहानेने व्याकूळ झालेल्या इस्राएली लोकांना परमेश्वराने मोशेद्वारे खडकातून पाणी दिले. शुभवर्तमानात येशू एका शोमरोनी स्त्रीजवळ पिण्याच्या पाण्याची मागणी करतो. तेव्हा तो म्हणतो, ''मी जे पाणी देतो ते जो प्राशन करील त्याला पुन्हा तहान लागणार नाही.'' पाणी हे जीवनादानाचे प्रतीक आहे म्हणून बाप्तिस्म्याच्या पाण्याद्वारे आपल्याला नवजीवन प्राप्त झाले. प्रभू येशू जीवनदायी कृपेचा अखंडपणे वाहणारा झरा आहे. आपल्या सर्व व्यथा, वेदना, आजार, संकटे व अडचणी त्या सार्वकालिक जीवनाच्या अथांग महासागराकडे आणू या व जिवंत पाण्याचे प्राशन करण्यास अनंत जीवनांचे वरदान मिळावे म्हणून पवित्र मिस्साबलीत प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे परमेश्वरा, प्रार्थना, उपवास व दयाकृत्ये याच्या सामर्थ्याने पापावर विजय मिळविण्यास तू आम्हांला शिकविलेस. आमच्या दुर्बलतेमुळे आम्ही जेव्हा निराश होतो, तेव्हा तुझ्या दयेवरील आमची श्रध्दा ढळू देऊ नकोस. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

प्रभूशब्द विधी

### पहिले वाचन

**निर्गम या पुस्तकातून घेतलेले वाचन १७:३-७**

**''आम्हाला प्यायला पाणी द्या.''**

इस्राएल लोकांना पाण्याची तहान लागली तेव्हा ते कुरकूर करून मोशेला म्हणाले, ''आम्हास, आमच्या मुलांस व आमच्या गुराढोरांस तहानेने मारुन टाकण्यास तू आम्हास मिसर देशातून बाहेर काढलेस काय?'' मोशेने परमेश्वराचा धावा करून म्हटले, ''ह्या लोकांकरिता मी काय करावे? हे तर मला बहुतेक दगडमार करावयास तयार झाले आहेत.'' परमेश्वर मोशेला म्हणाला, ''इस्राएलातील काही वडील माणसे बरोबर घेऊन व नील नदीवर आपली काठी हाती घेऊन लोकांच्यापुढे चाल. पाहा, होरेब पर्वतावरील एका खडकावर मी तुझ्यापुढे उभा राहीन. तू त्या खडकावर काठी आपट. त्यातून पाणी निघेल आणि ते हे लोक पितील.'' मोशेने इस्राएलच्या वडिलांदेखत तसे केले. मोशेने त्या ठिकाणाचे नाव मस्सा (परीक्षा) आणि मरीबा (कलह) असे ठेवले. कारण इस्राएल लोकांनी तेथे कलह केला आणि ''परमेश्वर आम्हामध्ये आहे किंवा नाही?'' असे म्हणून परमेश्वराची परीक्षा पाहिली.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

९४:१-२, ६-७ए; ८-९

प्रतिसाद : **आज तुम्ही प्रभूची वाणी ऐकाल तर किती बरे होईल!**

१. याहो या, आपण परमेश्वराचा जयजयकार करू या; आपल्या तारणदुर्गाचा जयजयकार करू. उपकारस्मरण करीत आपण त्याच्यापुढे जाऊ. स्तोत्रे गात त्याचा जयजयकार करू.

२. याहो या, परमेश्वर जो आपला उत्पन्नकर्ता त्याच्यापुढे आपण गुडघे टेकू; त्याची भक्ती करू, त्याच्यापुढे नमन करू. कारण तो आपला देव आहे आणि आपण त्याच्या कुरणातील प्रजा, त्याच्या हातचा कळप आहोत.

३. आज तुम्ही त्याची वाणी ऐकाल तर किती बरे होईल! मरिबाप्रमाणे रानातील मस्साच्या दिवशी केल्याप्रमाणे तुम्ही आपले मन कठीण करू नका. तेव्हा तुमच्या वडिलांनी माझी परीक्षा पाहिली, मला पारखले, माझी कृती पाहिली.

### दुसरे वाचन

**पौलाचे रोमकरांस पत्र यातून घेतलेले वाचन** ५:१-२,५-८

**''आपणाला दिलेल्या पवित्र आत्म्याच्याद्वारे आपल्या अंत:करणात देवाच्या प्रीतीचा वर्षाव झाला आहे.''**

आपण विश्वासाने नीतिमान ठरवलेले आहोत म्हणून आपणाला आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्याद्वारे देवाबरोबर शांती आहे. आपण ज्या कृपेमध्ये आहो, त्यात आपला प्रवेशही त्याच्याद्वारे विश्वासाने झाला आहे आणि आपण देवाच्या गौरवाच्या आशेचा अभिमान बाळगतो.

आशा लाजवीत नाही, कारण आपणाला दिलेल्या पवित्र आत्म्याच्याद्वारे आपल्या अंत:करणात देवाचा प्रीतीचा वर्षाव झाला आहे. आपण दुर्बळ असतानाच ख्रिस्त सुवेळी अभक्तांसाठी मरण पावला. नीतिमान मनुष्यासाठी कोणी मरणारा विरळाच. चांगल्या मनुष्यासाठी मरण्यास कदाचित कोणी धाडस करील. परंतु देव आपणांवरच्या स्वत:च्या प्रीतीचे स्मरण देतो की, आपण पापी असतानाच ख्रिस्त आपणांसाठी मरण पावला.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**योहान ४:४२.१५**

हे प्रभो, तू खरोखर जगाचा तारणारा आहेस; मला कधीही तहान लागू नये म्हणून जिवंत पाणी मला दे.

**योहानलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन ४:५-४२**

**''सार्वकालिक जीवनासाठी उसळत्या पाण्याचा झरा.''**

*(येशू शोमरोनामधून सुखार नावाच्या नगरात आला. ते याकोबने आपला मुलगा योसेफ ह्याला दिलेल्या शेताजवळ होते. तेथे याकोबचा झरा होता. चालून चालून दमलेला येशू तसाच त्या झऱ्यावर बसला. तेव्हा सुमारे सहावा तास होता.

तेथे शोमरोनाची एक स्त्री पाणी काढावयास आली. तिला येशू म्हणाला, ''मला प्यावयास पाणी दे.'' कारण त्याचे शिष्य अन्न विकत घ्यावयास नगरात गेले होते. तेव्हा ती शोमरोनी स्त्री त्याला म्हणाली, ''आपण यहुदी असता माझ्यासारख्या शोमरोनी स्त्रीजवळ प्यावयाला पाणी मागता हे कसे?'' कारण यहुदी शोमरोनी लोकांबरोबर संबंध ठेवत नसतात. येशूने तिला उत्तर दिले, ''देवाचे दान म्हणजे काय आणि मला प्यावयास पाणी दे असे तुला म्हणणारा कोण आहे हे तुला कळले असते तर तू त्याच्याजवळ मागितले असते. आणि त्याने तुला जिवंत पाणी दिले असते.'' ती स्त्री त्याला म्हणाली, ''महाराज, पाणी काढावयास आपल्याजवळ पोहरा नाही व विहीर तर खोल आहे; मग ते जिवंत पाणी आपल्याजवळ कोठून? आमचा पूर्वज याकोब ह्याने ही विहीर आम्हाला दिली. तो स्वत: त्याचे मुलगे व त्याची गुरेढोरे हिचे पाणी पीत असत. त्यांच्यापेक्षा आपण मोठे आहात काय?'' येशूने उत्तर दिले, ''जो कोणी हे पाणी पिईल त्याला पुन्हा तहान लागेल, परंतु मी देईन ते पाणी जो पिईल त्याला कधीही तहान लागणार नाही; जे पाणी मी त्याला देईन ते त्याच्यामध्ये सार्वकालिक जीवनासाठी उसळत्या पाण्याचा झरा असे होईल.'' ती स्त्री त्याला म्हणाली, ''महाराज, मला तहान लागू नये व पाणी काढावयास मला तेथवर येणे भाग पडू नये म्हणून ते पाणी मला द्या.'')

*संक्षिप्त रूपासाठी चरण (५-१५, १९-२६, ३९-४२) कंसात दिलेले पाठ

वापरता येतील.

येशू तिला म्हणाला, ''तू जाऊन आपल्या नवऱ्याला बोलावून आण.'' ती स्त्री म्हणाली, ''मला नवरा नाही.'' येशूने तिला म्हटले, ''मला नवरा नाही हे तू ठीक बोलतीस; कारण तुला पाच नवरे होते आणि आता जो तुझ्याबरोबर आहे तो तुझा नवरा नाही; हे तू खरे सांगितलेस.'' ती स्त्री त्याला म्हणाली, ''महाराज, (आपण संदेष्टे आहा हे आता मला समजले. आमच्या पूर्वजांनी ह्याच डोंगरावर उपासना केली आणि तुम्ही म्हणता, जेथे उपासना केली पाहिजे ते स्थान यरुशलेमेत आहे.'' येशू तिला म्हणाला, ''बाई, तुम्ही पित्याची उपासना ह्या डोंगरावर व यरुशलेमातही करणार नाही अशी वेळ येत आहे. हे मात्र खरे मान. तुम्हांला ठाऊक नाही अशाची उपासना तुम्ही करता; आम्हांला ठाऊक आहे अशाची उपासना आम्ही करतो; कारण यहुद्यातूनच तारण आहे. तरी खरे उपासक आत्म्याने व खरेपणाने पित्याची उपासना करतील अशी वेळ येत आहे; किंबहुना आलीच आहे; कारण आपले उपासक असे असावे अशीच पित्याची इच्छा आहे. देव आत्मा आहे आणि त्याच्या उपासकांनी त्यांची उपासना आत्म्याने व खरेपणाने केली पाहिजे.'' ती स्त्री त्याला म्हणाली, ''मसीहा, ज्याला ख्रिस्त म्हणतात तो येणार आहे हे मला ठाऊक आहे, तो आल्यावर आम्हांला सर्व गोष्टी सांगेल.'' येशू तिला म्हणाला, ''जो तुझ्याबरोबर बोलला आहे तो मी तो मीच आहे.'')

इतक्यात त्याचे शिष्य आले आणि तो एका स्त्रीबरोबर बोलत आहे ह्यांचे त्यांना आश्चर्य वाटले, तरी ''आपण काय विचारता आहा?'' किंवा ''आपण तिच्याबरोबर का बालत आहा?'' असे कोणी म्हटले नाही. ती स्त्री तर आपली घागर तेथेच टाकून नगरात गेली व लोकांना म्हणाली, ''चला, मी केलेली सर्व काही ज्याने मला सांगितले, त्या मनुष्याला पाहा, तोच ख्रिस्त असेल काय?'' तेव्हा ते नगरातून निघून त्याच्याकडे येऊ लागले.

दरम्यान शिष्य त्याला विनंती करू लागले की, ''गुरुजी जेवा.'' परंतु तो त्यांना म्हणाला, तुम्हाला ठाऊक नाही असे अन्न माझ्याजवळ खावयाला आहे यावरुन शिष्य एकमेकांस म्हणू लागले, ''याला कोणी खावयास आणले असेल काय?'' येशू त्यांना म्हणाला, ''ज्याने मला पाठवले त्याच्या इच्छेप्रमाणे करावे व त्याचे कार्य सिध्दीस न्यावे हेच माझे अन्न आहे. अजून चार महिन्याचा अवकाश आहे. मग कापणी येईल असे तुम्ही म्हणता की नाही? पाहा, मी तुम्हास म्हणतो, आपली नजर वर टाकून शेते पाहा; ती कापणीसाठी पिवळी होऊन चुकली आहेत. कापणारा मजुरी मिळवतो व सार्वकालिक जीवनासाठी पीक एकवट करतो; ह्यासाठी की, पेरणाऱ्याने व कापणाऱ्यानेही एकत्र आनंद करावा. एक पेरतो व एक कापतो अशी जी म्हण आहे ती ह्याबाबतीत खरी आहे. ज्यासाठी तुम्ही श्रम केले नव्हते ते कापावयास मी तुम्हांला पाठवले; दुसऱ्यांनी श्रम केले होते व तुम्ही त्यांच्या श्रमाचे वाटेकरी झाला आहा.''

(''मी केलेले सर्वकाही त्याने मला सांगितले, 'अशी साक्ष देणाऱ्या त्या स्त्रीच्या बोलण्यावरून त्या नगरातील पुष्कळ शोमरोनी लोकांनी त्याच्यावर विश्वास ठेवला म्हणून शोमरोनी त्याच्याकडे आल्यावर त्यांनी त्याला आपल्या येथे राहण्याची विनंती केली. मग तो तेथे दोन दिवस राहिला. त्याच्या वचनावरून आणखी कितीतरी लोकांनी विश्वास धरला. ते त्या स्त्रीला म्हणाले, ''आता तुझ्या बोलण्यावरून आम्ही विश्वास धरतो असे नाही, कारण आम्ही स्वत: ऐकले आहे व हा खचित जगाचा तारणारा आहे हे आम्हाला कळले आहे.

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक :**

माझ्या बंधुभगिनींनो, येशूचा पुनरुत्थानदिन जवळ येत आहे. दु:खसहन, मरण आणि पुनरुत्थान यांद्वारे स्नानसंस्कार घेतलेल्या आम्हांला आणि अखंड जगाला ख्रिस्ताच्या जीवनात अधिक सहभाग मिळावा म्हणून आपण प्रभूकडे मन:पूर्वक प्रार्थना करू या.

प्रतिसाद : **कर दानाचा वर्षाव देवा, वरदानाचा वर्षाव.**

१. पोप, बिशप्स, धर्मगुरू व व्रतस्थ यांना प्रकाशाच्या मार्गाने नेत असताना त्यांना शांतीचे व प्रेमाचे वरदान मिळावे म्हणून प्रार्थना करूया.
२. श्रद्धापूर्ण जीवन जगण्यास व देवाच्या सर्व आज्ञा पाळण्यास आपल्याला पवित्र आत्म्याची कृपा मिळावी म्हणून प्रार्थना करूया.
३. ह्या उपवासकाळात आपण ख्रिस्ताचा हृदयस्पर्शी आवाज ऐकून स्वत:चे अंत:करण, स्वत:चे कुटुंब, समाज व धर्म शुद्ध करण्यासाठी धाडसाचे आव्हान स्वीकारण्यास प्रभूचा आशीर्वाद मिळावा म्हणून प्रार्थना करूया.
४. आता थोडावेळ शांत राहून वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, या समर्पणाच्या कृपाप्रसादाने, क्षमेची याचना करणा-या आम्हास इतरांना क्षमा देण्यास तत्पर कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू येशूच्या नावाने करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, या संस्कारामध्ये आम्ही सहभागी झालो आहोत. आता आम्हाला पूर्णपणे पापमुक्त कर. आम्हामध्ये नेहमी शांती व ऐक्यभावना ठेव. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

प्रायश्चित्तकाळाचा एक महत्त्वाचा हेतू म्हणजे आजच्या सर्व वाचनांमध्ये दर्शविल्याप्रमाणे (निर्गम १७:३-७; रोम.५:१-२,५-८; योहान ४:५-४२) परमेश्वराशी बिघडलेले नातेसंबंध पूर्ववत करणे. आजच्या शुभवर्तमानामध्ये प्रभू येू शोमरोनी स्त्रीला चार पातळीवर हे संबंध सुधारण्यासाठी मार्गदर्शन करीत आहे.

**अ) परमेश्वराला पाहण्यासाठी आपण दृश्य स्वरूपापलीकडे जायला हवे :** येशूने जेव्हा शोमरोनी स्त्रीकडे प्यायला पाणी मागितले तेव्हा तिला आश्चर्य वाटले.तो केवळ एक यहुदी पुरुष आहे असे तिला दिसले. त्यामुळे त्याच्याजवळ जीवनाचे पाणी असेल असे तिला वाटले नाही.

**ब) परमेश्वराशी नाते प्रस्थापित करण्यासाठी आपण आखीव रेखीव सीमारेषांपलीकडे जायला हवे :** याकोब आपला पूर्वज आहे याविषयी शोमरोनी स्त्रीला खूप अभिमान वाटत होता. त्याच्यापेक्षा येशू श्रेष्ठ असू शकेल अशी तिची अपेक्षा नव्हती. येशू तिला याकोबच्या विहिरीतील पाण्याची मर्यादा दर्शवून ते पाणी माणसाची खरी तहान भागवू शकत नसल्याचे स्पष्ट करतो.

**क) परमेश्वराची उपासना करण्यासाठी आपण आपल्या धार्मिक जीवनापलीकडे जायला हवे :** गेरिझीम पर्वतावर जाऊन प्रार्थना केली की आपण परमेश्वराची उपासना केली असे शोमरोनी स्त्रीला वाटत होते. मात्र देवपित्याची उपासना विशिष्ट जागी न करता ती विशिष्ट प्रवृत्तीने म्हणजे आत्म्याने व खरेपणाने करायला हवी असे येशू तिला सुचवितो.

**ड) परमेश्वराला ओळखण्यासाठी मशिहाविषयी असलेली आपली संकल्पना व्यापक करायला हवी :** शोमरोनी स्त्री मशिहाची वाट पाहात होती. तो येईल तेव्हा आपल्याला सर्वकाही शिकवील असे तिला वाटत होते. मात्र मशिहा साक्षात् समोर उभा होता. दूरचे पाहताना ती जवळचे पाहायला विसरली होती. येशूच्या शब्दांनी व प्रेमळ सहवासाने तिची संकल्पना व्यापक बनली. घागर तिथेच ठेवून ती ग्रामस्थांना येशूच्या पायांपाशी घेऊन आली.

**आत्मपरीक्षण :** ह्या प्रायश्चित्तकाळात परमेश्वराशी असलेले माझे नातेसंबंध सुधारण्यासाठी मी काय काय करीत आहे?

●●●

| मार्च २०२३ | | बायबल वाचने | तिसरा सप्ताह |
|---|---|---|---|
| सोम १३ | सेव्हिलचा सं लिएंडर (जां) | : २ राजे ५:१-१५/ लूक ४:२४-३० | |
| मंगळ १४ | सं मॅटिल्डा (जां) | : दानीएल ३:२५,३४-४३/मत्तय १८: २१-३५ | |
| बुध १५ | सं लुईजा डी मारिलेक (जां) | : अनुवाद ४:१,५-९/मत्तय ५: १७-१९ | |
| गुरू १६ | सं हेरीबर्ट (जां) | : यिर्मया ७:२३-२८/लूक ११:१४-२३ | |
| शुक्र १७ | सं पॅट्रीक (जां) | : होशेया १४:१-९/मार्क १२: २८-३४ | |
| शनि १८ | जेरूसलेमचे सं सिरील (जां) | : होशेया ५:१५-६:६/मार्क १८:९-१४ | |